Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 26-Mar-15 6:05:25 PM

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था

विषय :- मार्च/एप्रिल, २०१५ च्या लेखी परीक्षांची समरी/नेमलिस्ट व हॉलतिकीट व ऑड नंबर याबाबतची स्पष्टता

महोदय/महोदया,

वरील विषयासंदर्भात कळविण्यात येते की, दिनांक ३० मार्च २०१५ पासून विद्यापीठाच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. सदर परीक्षांच्या समरी, हॉलतिकीट, नेमलिस्ट सर्व संबंधित महाविद्यालयांनी खाली दर्शविलेल्या पोर्टलवरून काढून घेण्याच्या आहेत.

ज्या परीक्षांची नोंदणी व निकाल http://suk.digitaluniversity.ac/ पोर्टलवरून झालेली आहे अशा सेमेस्टर-१ ते ६ च्या विद्यार्थ्यांची समरी, नेमलिस्ट, हॉलतिकीट, सुपरवायझर रिपोर्ट इत्यादी कागदपत्रे http://suk.digitaluniversity.ac/ या पोर्टलवर उपलब्ध होतील.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे व परीक्षेस बसू द्यावे. याबाबत आपणास कांही अडचण उद्भवल्यास परीक्षा विभागाशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवू नये. ज्या विद्यार्थ्यांच्या निकालात कांही कारणास्तव अडचणी आलेल्या अशा विद्यार्थ्यांच्या निकालामुळे त्यांचे परीक्षा अर्ज भरण्याबाबत अडचणी आल्या आहेत त्यांचे निकाल व पुढील परीक्षांचे परीक्षा अर्ज जस जसे निकाल दुरूस्त होत आहेत तस तसे संकेत स्थळावर उपलब्ध होत आहेत.

कोणत्याही परिस्थितीत मॅन्युअल अर्ज स्विकारू नयेत असे कळविण्यात आलेले होते. तथापि दिनांक १३ मार्च २०१५ च्या परिपत्रकान्वये निकालादी कारणास्तव ज्यांचे परीक्षा अर्ज जनरेट होऊ शकलेले नाहीत त्यांचे परीक्षा अर्ज व त्याची माहिती विहित नमुन्यात भरून त्याची सॉफ्ट कॉपी विद्यापीठात जमा करावी असे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे कांही महाविद्यालयांनी माहिती जमा केलेली आहे. त्याअनुषंगाने त्या त्या महाविद्यालयांतील अशा विद्यार्थ्यांना संगणक प्रणालीद्वारे बैठक क्रमांक व हॉल तिकीट देण्याबाबतही प्रयत्न सुरू आहेत. महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक व हॉल तिकीट आपापल्या लॉगीनमध्ये उपलब्ध झालेले आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करावी.

***जर मॅन्युअली आलेल्या अर्जांपैकी कांही विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक व हॉल तिकीट तयार होण्यात तांत्रिक अडचण आल्यास अशा विद्यार्थ्यांची महाविद्यालयनिहाय संकलित यादी व त्यांना द्यावयाचे बैठक क्रमांक विद्यापीठाच्या दोन्ही संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. महाविद्यालयांनी या बैठक क्रमांकाखेरीज कोणतेही बैठक क्रमांक परस्पर देऊ नयेत. महाविद्यालयांनी परस्पर बैठक क्रमांक दिल्यास अशा उत्तरपत्रिका ग्राहय धरण्यात येणार नाहीत.***

**ज्या महाविद्यालयांनी विहित नमुन्यात मॅन्युअल अर्जांची माहिती सॉफ्ट कॉपीमध्ये जमा केलेली नाही त्यांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही व अशा विद्यार्थ्यांना आयत्यावेळी बैठक क्रमांकही दिले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.**

ऑक्टोबर-१४ मध्ये झालेल्या परीक्षेस बसलेल्या ऑड नंबरच्या विद्यार्थ्यांचे बहुतांश निकाल सुधारित करून संकेतस्थळावर देण्यात आलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना कंबाईन परीक्षेस बसावयाचे आहे परंतु महाविद्यालयांकडून त्यांच्या एखाद्याच सेमेस्टरचा परीक्षा अर्ज इनवर्ड केला गेला असेल व कंबाईन सेमेस्टरचा राहिला असेल तर अशा विद्यार्थ्यांनी ज्या सेमेस्टरला त्यांचा बैठक क्रमांक आलेला आहे त्याच बैठक क्रमाकांने त्याच्या कंबाईन सेमेस्टरची परीक्षा द्यावयाची आहे. त्यासाठी स्वतंत्र बैठक क्रमांक घेण्यात येऊ नये.

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY,** KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 26-Mar-15 6:05:25 PM



डियु पोर्टलवर असणा-या परीक्षांचे अंतर्गत गुण व प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण, एनएसएसचे गुण वर दर्शविलेल्या प्रणालीतूनच भरावयाचे आहेत. असे गुण दिनांक १० एप्रिल, २०१५ पर्यंत किंवा तत्पूर्वी आपापल्या लॉगीनमधून महाविद्यालयांनी भरावयाचे आहेत. तसे त्यांची स्वाक्षरीकृत प्रत गोपनीयरित्या संबंधित परीक्षा विभागात जमा करावी.

आपापल्या महाविद्यालयांतील विद्यार्थी संख्या व आलेल्या प्रश्नपत्रिका यांचा ताळमेळ वेळीच घ्यावा. प्रश्नपत्रिकांच्या पॅकिंगवरील तारखा व परीक्षेच्या वेळेची स्टार सिस्टिम समजून घ्यावी व त्यावेळेप्रमाणेच प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्याबाबतची दक्षता घ्यावी.

हॉल तिकीटवर जे केंद्र आहे त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावयाची आहे. महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र बदलून देऊ नये. आयत्या वेळी परीक्षा केंद्र व विषय बदल केल्यास असे बदल ग्राहय धरण्यात येणार नाहीत व अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अहितास विद्यापीठ जबाबदार असणार नाही. याबाबतची माहिती सर्व संबंधित घटकांना द्यावी.

परीक्षा व्यवस्थित पार पाडण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

सही/-

परीक्षा नियंत्रक
(महेश काकडे)

प्रत : सर्व परीक्षा विभागप्रमुख यांना माहितीसाठी